

आता आपण बोलूयात माझ्या रहिवासाबद्दल म्हणजेच जंगलांबद्दल.



पण जंगल म्हणजे नक्की
काय बरं??



या सगळया फोटोंतून जे दिसतय ते म्हणजे जंगल???




काय काय एकत्र येऊन जंगल बनत असेल??



## उंचीवरील पर्णसंभार

-झाडांच्या फांद्या आणि पानांपासून बनलेला सर्वात उंच स्तर


-जंगलावर येणारया सूर्यप्रकाशापैकी जवळपास 50% किरणे याच स्तरावर अडतात.



# जंगलाचा पोटमाळा

-हा झाडांच्या रोपटयांपासून आणि छोटया झाडांपासून बनलेला असतो.

-एखादं मोठं झाड मेलं की त्याची रिकामी जागा ही छोटी रोपटी घेतात.



# झूडूपं

-जमीनीपासून 3-7 फूट उंचीपर्यंत ही झूडूपं वाढतात.

-खाद्याच्या शोधात फिरणारया शाकाहारी प्राण्यांसाठी अन्नपुरवठयाचे काम ही झूडूपं करतात.



## छोटया वनस्पती आणि नेचे (Ferns)


-जमीनीपासून 3-7 फूट उंचीपर्यंत ही वाढतात.

-या स्तरातील बहुतेक वनस्पती हया अल्पजीवी असतात.



# पालापाचोळा

-जंगलातील सर्व मृत गोष्टी जमीनीवर पडतात. साचत जातात.हा जमा झालेला पालापाचोळा म्हणजे, विविध प्रकारच्या बुरशी, कीटक यांचे घर असते.


उंचीवरील पर्ण संभार
जंगलाचा पोटमाळा
झुडूपं
छोटया वनस्पती आणि नेचे
पालापाचोळा

हे झाड....??? हे जंगलातले असू शकेल ? का ??



जंगलातील विविध स्तरांमूळे वेगवेगळे वातावरण असलेल्या सूक्ष्म अधिवासाच्या अनेक जागा तयार होतात.

या वेगवेगळया स्तरांमूळे जंगलातील तापमान आर्द्रता हवेचा वेग यात ठिकठिकाणी बदल घडत जातात.

जंगलातील मातीचे विविध प्रकार आणि त्यातील विविध घटकद्रव्ये यांचा या वातावरणात घडणारया बदलांमध्ये मोठा हातभार असतो.









## उर्जा साठवण्याची क्षमता.

जंगलात आढळणारया मोठया झाडांमूळे सूर्यापासून मिळणारी उर्जा मोठया प्रमाणावर साठवल्या जाते.



मोठया झाडांची खोडं फांदया कूजण्यास जास्त वेळ लागतो.

त्यामूळे ते भाग जमीनीवर बराच काळ पडून रहातात.

त्यामूळे जमीनीवर रहाणारया बरयाच प्राण्यांना वसतिस्थाने मिळतात.








# पाणी

जंगलातील झाडांमध्ये , त्यांच्या मोठया आकारमानामूळे आणि रचनेमूळे , खूप पाणी साठविण्याची क्षमता असते.






आपली आंबोली

